"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : ०२२ – ४७४९ ८२५९

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। पुरुष कार्यम् अनुवर्तते दैवम् ।।

परस्परम् भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ

मूल्य रु. ५

क्रमांक १ वर्ष : ४७ एप्रिल–जून २०२५

BOOK PACKET

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

TO,

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## माहीम येथील हळदीकुंकू

दिनांक १८ जानेवारी रोजी संध्याकाळी ४.३० ते ७ वाजेपर्यंत माहीम येथील मिराज टॉवरमध्ये महिलांचा यंदाचा हळदीकुंकू कार्यक्रम थाटामाटात साजरा झाला. या प्रसंगी एकूण ६० महिलांनी हजेरी लावली. त्यांच्यासाठी 'वाण' देण्याची व फराळाची चोख व्यवस्था श्री. राजीव गायतोंडे व श्री. शिवानंद कुलकर्णी यांनी उत्तमरीत्या पार पाडली. त्यांच्या पत्नी सौ. आरती गायतोंडे व सौ. स्मिता कुलकर्णी यांनी पुढाकार घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. दादर ते माटुंगा व माहीम भागातील सारस्वत भगिनींनी हिरीरीने यात भाग घेतला.

सौ. रश्मी वायकुळे, रुची मांजरेकर तसेच योगीता जाधव यांनी सर्वांचा चहा नाश्त्यापासून वाण देण्यापर्यंत सहकार्य केले. नंतर 'उखाणे' घेण्याच्या कार्यक्रमाने आणखीनच रंगत आणली. वयस्क महिलांमध्ये सौ. सुहासिनी सदानंद नाडकर्णींनी उखाणे घेऊन सर्व महिला वर्गाचा उत्साह वाढवला. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला शोभा आली.

उपस्थित सर्व भगिनींचे मुखपत्रिकेतर्फे मन:पूर्वक आभार.









## ठाणे मंचचा तिळगुळ समारंभ

दिनांक २१ जानेवारी रोजी संध्याकाळी ४ ते ७ वाजेपर्यंत ठाणे येथील सौ. सुरेखा पालेकर यांच्या घरी महिलांचा यंदाचा तिळगुळ समारंभ थाटामाटात साजरा झाला. साधारण ४० भगिनींनी उपस्थिती लावली.

हा कार्यक्रम खऱ्या अर्थाने तिळगुळ समारंभ झाला. कारण बऱ्याच आमच्या बंधुंनी हजेरी लावून मंचाने दिलेल्या नाश्ता व मसाला दुधाचा कौतुकाने आस्वाद घेतला.

स्मिता वाघ, ज्योती सुखटणकर आणि प्रिया कुलकर्णी या भगिनींनी नाट्यगीते व भावगीते गाऊन समारंभाला शोभा आणली.

सुरेखा पालेकर यांना ज्योती सुखटणकर, उमा वागळे, शिला कुरडईकर, तसेच मी, शैलजा दिवेकर यांनी हातभार लावला.

**– शैलजा रा. दिवेकर,** डोंबिवली –मो. ९८१९७८६८५५.











संपादकीय

# द्वारकानाथ संझगिरी आणि शिरीष कणेकर

आमच्या म्हणजे आजच्या ७० ते ७५ वयाच्या वाचकांनी आयुष्यभर उत्तम कलाकार पाहिले, अनुभवले व त्यावर तासन्तास चारचौघांच्यात भाष्य केले आहे.

आत्ताच द्वारकानाथ संझगिरी गेल्याचे वृत्त हाती आले. एक उत्तम क्रिकेट समीक्षक गमावल्याचा प्रत्यय आला व कुठेतरी काळजाचा ठोका चुकला!

द्वारकानाथ काय किंवा शिरीष कणेकर काय, क्रिकेटवर, हिंदी चित्रपटांवर लिहावे तर त्यांनीच! डि.के. रत्नाकर किंवा विजय मर्चंटची कॉमेंट्री असो वा नरी कॉन्ट्रेक्टरच्या डोक्याला उसळत्या चेंडूने मार बसलेला असो, किंवा बापू नाडकर्णीची ऑस्ट्रेलिया विरुद्धची गोलंदाजी ३२ ओवर २९ मेडन ३ रन १ विकेट असो तसेच रमाकांत देसाईने प्रत्येक टेस्टमध्ये हनीफ महम्मदला 'मामा' बनवलेलं असो, अब्बास अली बेगने ५० रन केल्यावर त्याच्या प्रियेने पीचवर येऊन त्याचा मुका घेतला, चंदू बोर्डेने शतक मारल्यावर बापू टांगेवालाने जाऊन त्याच्या गळ्यात हार घातला, जसू पटेलने कानपूरच्या टेस्टमध्ये ऑस्ट्रेलियाला १०४ मध्ये गुंडाळताना १२ विकेट्स घेतल्या, बुधी कुंदरनची विकेटकिपींग पेक्षा बॅटींग पहाण्यातली मजा, नाना जोशी वा नरेंद्र ताम्हाणेंची विकेटकिपींग वाखाणण्याजोगी होती, हे सर्व किस्से त्यांच्या लिखाणातून वाचताना गर्वाने छाती फुलायची! ह्या सर्वांवर रसभरीत लिहावं तर या दोघांनीच!

बिनाका गीत मालातल्या अमीन सयानीच्या आवाजाबद्दल तेच सडेतोड लिहू शकतात. लता–आशावर तर त्यांनी इतकं लिहिलंय की त्या साक्षात् समोर गात असल्याचा भास व्हावा. रफींचा दमदार आवाज मुकेशची दर्दभरी गाणी, मन्नाडेंचे शास्त्रोक्त गायन यावर लिहिण्याचा हक्क त्यांचाच! देव–राज–दिलीप यांचे चित्रपट पुन्हा–पुन्हा पहाणारी आमची पिढी शंकर–जयकिशन–मदन मोहन वा ओ.पी. नय्यर यांच्या संगीतावर आम्ही कधीच जीव ओवाळून टाकलाय.

पंडित भीमसेन जोशींचे गायन म्हणा वा झाकीर हुसेनचे तबलावादन म्हणा या कानाने तृप्त होऊन ऐकणारे आम्हीच साक्षीदार आहोत.

इतकेच नाही तर द्वारकानाथने तर गोव्याच्या देवी–देवतांबद्दल व त्यांच्या भव्य मंदिरांबद्दलही जे लिहून ठेवले आहे त्याला 'मर्मबंधातली ठेव ही'च म्हणायला हवं.

असे हे दोघे विश्लेषक. त्यांना नम्र वंदन. त्यांच्या आत्म्याला चिरशांति लाभो हीच परमेश्वरा चरणी प्रार्थना !

**– प्रसाद (पंकज) मोहन कसबेकर** – संपादक



**दि एन्.के.जी.एस.बी. संघाच्या नव्या कार्यकारिणीची निवडणूक**
**संघाच्या सभासदांना सूचना**

संघाची कार्यकारिणी ही निवडून आलेले एक अध्यक्ष आणि आठ सभासद व दोन स्वीकृत सभासद अशा सभासदांची असते. संघाच्या सध्याच्या कार्यकारिणीची मुदत ३१ मार्च २०२५ रोजी संपत आहे. तेव्हा ज्या सभासदांना २०२५ ते २०२८ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी अध्यक्ष वा कार्यकारिणी सभासद म्हणून काम करायचे असेल त्यांनी संघाच्या कार्यालयातून छापील अर्ज घेऊन सूचक व अनुमोदक यांच्या सह्यांसकट अर्ज पूर्ण करून दि. ३० एप्रिल २०२५ संध्याकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयात सादर करावेत.

– अध्यक्ष, NKGSB संघ

**मुंबई मंच व ठाणे मंच – नव्या कार्यकारिणीची निवड**

मुंबई मंच व ठाणे मंच या उभय शाखांच्या कार्यकारिणीची मुदत ३१ मार्च २०२५ रोजी संपत आहे. पश्चिम व पूर्व उपनगरांत राहणाऱ्या ज्या सभासदांना २०२५ ते २०२८ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी कार्यकारिणीवर सभासद म्हणून काम करावयाचे असेल त्यांनी आपली नावे ३० एप्रिल २०२५ पर्यंत अनुक्रमे खालील ठिकाणी सादर करावीत.

**मुंबई मंच** **ठाणे मंच :** संपर्क – सुरेश पालेकर : ९९६९४ ५५३७०

संघ कार्यालय, गिरगांव

**नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबतीच्या नियमानुसार**
**'नार्थ कॅनरा जी.एस्.बी. वृत्तविलास' त्रैमासिकाचे प्रकटन**

Form IV Rule 8

**१. प्रकाशन स्थळ :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस्.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी. रोड, मुंबई ४

**२. प्रकाशन अवधी :** त्रैमासिक

**३. मुद्रक, प्रकाशक आणि संपादक :** प्रसाद मोहन कसबेकर, राष्ट्रीयत्व : भारतीय

पत्ता : दि नॉर्थ कॅनरा जी.एस्.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी. रोड, मुंबई ४

**४. मालक :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस्.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी. रोड, मुंबई ४

मी, प्रसाद मोहन कसबेकर, या निवेदनाद्वारे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

**मुंबई, १ मार्च २०२५** **प्रसाद मोहन कसबेकर** – प्रकाशक

## प्रकाश झोत–१

### सदाशिवगडची कन्या सुजाता गडकर विल्कॉक्स अमेरिकेच्या सिनेटर




आपल्यातील वाघ, नाडकर्णी, वैश्णव, वर्टी, पिंगे वगैरे ज्ञातिबांधव हे सदाशीवगडचे ग्रामस्थ. पु लं.नी ही 'माझे गांव सदाशीवगड' असे आत्मवृत्त लिहिले आहे. त्यामुळे ते ही तिथलेच ग्रामस्थ. सदाशीवगडाची ग्रामदेवता म्हणजे प्रख्यात श्री शांतादुर्गा महामाया, तेथील गेल्या पिढीतील सेवेकरी म्हणजे किशोरी आप्पा गडकर. त्यांचे चिरंजीव अशोक यांनी टेलीकम्यूनिकेशन विषयात प्रतिकुल परिस्थितीत पदवी मिळवली व अमेरिकेत प्रयाण केले आणि स्वतःचा व्यवसाय उत्तम रितीत चालवून नावारूपाला आले. अशोकची ४५ वर्षांची कन्या सुजाता गडकर विल्कॉक्स ही कनेक्टीकट परगण्यातील हॅम्डन ह्या विद्यापीठाच्या विधी विद्यालयात सहप्राध्यापिका म्हणून कायदा विषय शिकवते. गेल्या वर्षी झालेल्या सिनेटच्या निवडणुकीत ती कनेक्टीकटमधून डेमोक्रेटीक पक्षातर्फे सिनेटर म्हणून निवडून आली. सदाशीवगडच्या समस्त ग्रामस्थांना तिच्या असामान्य कर्तृत्वाबद्दल कौतुक व अभिमान वाटणे साहजिक आहे.

## प्रकाश झोत–२

### काव्या चौधरी हिचे अभिमानास्पद यश




आपल्या ठाणे मंचाशी निगडीत कै. श्रीनिवास देसाई, ठाणे यांची अकरा वर्षाची नात, काव्या चौधरी हिने सुरत, गुजरात येथे झालेल्या जिम्नॅस्टिक फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित जिम्नॅस्टिक्स राष्ट्रीय स्पर्धेत अनइव्हन बार वैयक्तिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले आणि महाराष्ट्राला सांघिक स्पर्धेत रौप्यपदक मिळवून दिले. आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्समधील ऑल इंडिया सब–ज्युनियर ऑल राऊंड रॅंकिंगमध्ये, ती चौथ्या क्रमांकावर आली आहे.




MSIPL
We Make People Richer

# Mangsidesh Investment Pvt Ltd

**AMFI-Registered Mutual Fund Distributor**


402, Business Point, Paliram Road, Off S. V. Road, Behind Brahma Kumari Hosp., Andheri (West), Mumbai 400 058

Contact No. 022 4233 2300 to 2399, +91 91672 20380

## Invest in Your Future with Confidence

**Benefits to Invest in Mutual Fund:-**

1. Diversified portfolio to manage risk
2. Professional fund management expertise
3. Variety of asset classes (equity, debt, hybrid, index, ETFs)
4. Liquidity and flexibility
5. Potential for higher long-term returns




**Grow your wealth with our expertly managed Mutual Funds**

A little every month grows to something significant over time..


Invest Rs. 1,000/- Per month & get ..

| Investment Years | Total Investments | Growth rate 8% | Growth rate 12% | Growth Rate 15 % |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 275,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |

Indian Equity market has given average 16% returns in last 33 years

Activat
Go to Se

Mutual Fund Investments are subject to market risk, Read offer documents carefully before Investing.



**LATE CA SHRI DILIP MADHAV MUZUMDAR**

27th February 1944 - 4th January 2025

Late Shri Dilip Madhav Muzumdar was born in Mumbai. He completed his B. Com. from Potdar College and L. L. B. from Govt. Law College.

After completing C.A. from Institute of Chartered Accountant in the year 1966, he joined Borkar & Muzumdar C.A. firm from 10th July 1967 as a partner.

Borkar & Muzumdar firm was established 78 years ago and later on he rose to become Senior Partner of the firm. In view of his in depth knowledge he was invited on the Board of Directors of SBI of DFHI Ltd. a co. affiliated to the State Bank of India. He was also a member of the study group formed by the Reserve Bank of India to streamline audit guidelines for the State co-op. banks. His audit firm is also looking after the audit of the NKGSB Bank, The NKGSB Sangh & The NKGSB Education Society.

He was member and well wisher of the Sangh and The Education Society. He was the Chief Guest of The NKGSB Sneh-Sammelan in the year 2004 and was honoured as The Honorary Member of the Education Society in the Sneh-Sammelan held in the year 2013. He would be remembered by all of us for his smiling face and very helpful nature.

Thanks.

**- DEVDAS NADKARNI**

### ठाणे मंचने आयोजित केलेली एक दिवसाची सहल

## बलंग फार्मस, रिसोर्ट वज्रेश्वरी

रविवार दिनांक १५-१२-२०२४ रोजी सकाळी ७.३० च्या दरम्यान जोगेश्वरी, ठाणे, माहीम येथून प्रत्येकी एक बस वज्रेश्वरीस जाण्यास निघाली. ठाणे बसची व्यवस्था श्री. सुरेश पालेकर यांनी माहीम बसची व्यवस्था श्री. अरुण बोरकर व जोगेश्वरी बसची व्यवस्था आणि प्रवाशांची सुखसोय श्री. प्रसाद गायतोंडे यांनी पाहिली. त्या सर्वांचे आभार.

ठीक ९ च्या सुमारास आम्ही (जोगेश्वरी बस) बलंग फार्म, वज्रेश्वरी येथे पोहोचलो. त्यानंतर अर्ध्या तासात ठाणे व माहीमच्या बसेस आल्या. आयोजकांनी आमच्यासाठी चार खोल्या राखून ठेवल्या होत्या. तेथे आमचे सामान ठेवून आम्ही फ्रेश झालो. जवळच फार्मचे कँटीन होते. तेथे व्यवस्थित खुर्च्या, टेबले लावून ठेवली होती. चहा, कॉफी गरमा गरम होती. त्याबरोबर इडली व वडा-सांभार व गरमागरम उपमा. त्यावर सर्वांनी ताव मारला. नाश्ता चविष्ट होता.



कँटीनच्या मागे मोठा हॉल होता. तेथे सगळे एकत्र झाले. आम्ही सगळे मिळून पन्नासएक लोक होतो. तेथे श्री. सुरेश पालेकर यांनी श्री. राजेश दिवेकर, अरुण बोरकर, प्रसाद गायतोंडे ह्यांची ओळख करून दिली. तसेच सहलीची चांगली व्यवस्था केल्याबद्दल, श्री. राजेश दिवेकर यांचे आभार मानले.

त्यानंतर गणेशपुरी व प्रतीशिर्डीसाठी एक मोठी बस सोडली. तिकडे गणेशकुंड, महादेवाचे देऊळ, नित्यानंद स्वामी महाराजांचा मठ, साईबाबा मूर्ती हे पाहून मन प्रसन्न झाले व काहीतरी नवीन बघितल्याचा आनंद झाला. साधारण दोन वाजता बस परत आली. थोड्याच वेळात सुग्रास जेवण झाले. शाकाहारीसाठी डाळ भात, चपाती, कुर्मा भाजी, बटाटा सुकी भाजी, सॅलड, पापड लोणचे आणि गुलाब जामून असा मेनू होत. मांसाहारींना वरील पदार्थ व चिकन असा आहार होता. सर्वजण जेवण जेवून तृप्त झाले. थोड्या विश्रांतीनंतर बाहेरील हॉलमध्ये करमणुकीचे कार्यक्रम चालू झाले.

सुरुवातीला ज्योती सुखठणकर, ठाणे ह्यांनी ये समा है ये प्यार का हे हिंदी गाणे सुरेल आवाजात म्हटले. त्यानंतर श्री. प्रदीप दाभोळकर, जोगेश्वरी ह्यांनी तुमको देखा तो ये खयाल आया ही जगजीत सिंगची गझल अत्यंत जोशात गाईली. नंतर तेजश्री कुलकर्णीने (जोगेश्वरी) मेरे मन ये बता दे तू (मितवा) फारच छान गाईले. सुवर्णा कुर्डेकर, ठाणे, धुंद मधुमती रात रे रात रे हे गाणे पण छान वाटले. आर्वी स्थळेकर अंधेरी ह्या छोट्या मुलीने O My Friend Ganesha हा डान्स केला. तसेच तिने एक होती इडली हे गाणे पण म्हटले. श्री. पराग थळी, विरार, ह्यांनी बेकरार करके हमें यू न जाईये हे गाणे म्हटले. समीर देसाई, सायन ह्याने Prayer to the Sun ही इंग्लीश कविता सादर केली. सान्वी थळी, विरार हिने आजा नाचले हा माधुरी दीक्षितचा सुंदर डान्स सादर केला. तसेच दुसरी नृत्यांगना संध्या पै (वागळे) हिने तीन डान्स सादर केले. त्यातला निशाणा तुला दिसला ना फारच चांगला झाला व प्रेक्षकांनी त्याला दाद दिली. अशोक पै ह्यांनी पण आजा आजा मेरी जान हे गाणे म्हटले. सुपर सिनियर ज्येष्ठ नागरिक तारा मावशी गायतोंडे, जोगेश्वरी ह्यांचा शिवाजी महाराजांचा पोवाडा डफाशिवाय अत्यंत उत्कृष्ट झाला. त्यांच्या स्मरणशक्तीचे कौतुक करावे तेवढे थोडे. सर्व कलाकारांना तारामावशी ह्यांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली व तारा मावशींना श्री. राजेश दिवेकर ह्यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. संध्याकाळी ५.३० वाजता चहा, कॉफी व गरमा गरम कांदा भजीचा आस्वाद घेऊन परतीच्या प्रवासास सुरुवात झाली.

दरवर्षी सर्वांनी ठाणे मंचच्या सहलीत सहभाग घेऊन आनंद द्विगुणित करावा अशी विनंती.

– उमाकांत का. पालेकर, जोगेश्वरी (पूर्व)–मोबा. ८१०८२९६९१२





# २४ वे शेठ शांताराम मंगेश कुलकर्णी मेमोरियल लेक्चर द्वारा –

श्री. विजय विश्वनाथ कुवाळेकर (वरीष्ठ पत्रकार, लेखक व कवि)

विषय : **'विश्वासार्हतेचा प्रश्न'**

जागा : कोहीनूर हॉटेल मॅनेजमेंट कॉलेज

वेळ : शनिवार ११ जानेवारी संध्याकाळी ५ वाजता

प्रस्तुतिः NKGSB Chair person, Board of Directors and staff of NKGSB.

'शेठ शांताराम मंगेश कुलकर्णी मेमोरियल लेक्चर' NKGSB बँकेने ठेवले होते. श्री. विजय विश्वनाथ कुवाळेकर (आघाडीचे पत्रकार, लेखक व कवि) यांचे 'प्रश्न विश्वासार्हतेचा' यावर लेक्चर होते. ते ५.४५ वाजता सुरू झाले व ७ वाजेपर्यंत चालले. यामध्ये त्यांनी आजच्या भारतात चाललेल्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, मिडीया, पत्रकारिता, नोकरदार वर्गाचे प्रश्न, राष्ट्रीय पातळीवरचे खेळ इत्यादिवर प्रकाश टाकला. त्यांनी स्पष्ट केले की आज एकूण विश्वासार्हतेची मोठी उणीव सर्व क्षेत्रात दिसत आहे. त्यांच्या मते करप्शन हे सर्रास सर्वत्र दिसून येते. काही टक्के चांगले लोकही आहेत ज्यांच्यामुळे हे जग चालले आहे पण बहुतांशी विश्वासार्हतेचा बळी पडताना दिसतो आहे.




रंगमंचावर उपस्थित मान्यवर



श्री कुवाळेकर, एनकेजीएसबी
अधिकाऱ्यां समवेत







Tulsi Gavda from karwar tribal area passed away recently. She is from tribal groups (gavadti) received Padma Shree from President of India for her research on medicine from plant's from jungle nearby karwar area.

पुढारी भवन, ५६, अजिंक्य आर्केड,
चिंचनाका शिवाजी चौक), चिपळूण.
दूरध्वनी क्र. ०२३५५२९९२३४

**✻ पुढारी**

चिपळूण कार्यालय
दि.२८ डिसेंबर २०२४

प्रती,
मा. डॉ. सतीश वाघ
संस्थापक–अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सुप्रिया लाईफ सायन्स लि. लोटे
**विषय: 'पुढारी आयकॉन पुरस्कारा'बाबत**
महोदय,

सर्वप्रथम आपले अभिनंदन! दै. पुढारीच्या ८६व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने कला, साहित्य, क्रीडा, राजकारण, समाजकारण, उद्योग या क्षेत्रात उंच भरारी घेणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान होणार आहे. यावेळी ''पुढारी महामुंबई आयकॉन'' अर्थात ''गौरव कर्तृत्वाचा, अभिमान महाराष्ट्राचा'' हा गौरव सोहळा होणार आहे. या सोहळ्यासाठी आपण सहकुटुंब मित्रपरिवारासहीत हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी उपस्थित राहाल हा आमचा विश्वास आहे. यामुळे या कार्यक्रमाला अधिक शोभा येईल. मान्यवरांच्या उपस्थितीत आपल्याला ''पुढारी आयकॉन''हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

आपण आजवर शून्यातून निर्माण केलेला हा उद्योग राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचविला आहे. त्यामुळे मराठी माणसाची ही भरारी निश्चितच अभिमानास्पद आहे. म्हणूनच ''पुढारी''च्या वतीने आपला गौरव होत आहे. त्याचा आपण सन्मानपूर्वक स्वीकार करावा ही विनंती! याच कार्यक्रमात उपस्थितांसाठी खास पर्वणी ठेवण्यात आली आहे. संदीप खरे आणि डॉ. सलील कुलकर्णी यांचा 'आयुष्यावर बोलू काही' हा कार्यक्रम देखील होणार आहे. याचाही आस्वाद घ्यावा.

सहकार्याच्या अपेक्षेसह,
बुधवार, दि. ०१ जानेवारी २०२५
वेळ : दुपारी ३:३० वा.
स्थळ : डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, ठाणे (प.)

संपर्क: समीर जाधव (८९९९६४९९१७)
आपला विश्वासू,
श्री. शशिकांत सावंत, निवासी संपादक
मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी

**टीप : वर दिलेले ''पुढारी'' वृत्तपत्राचे हे डॉ. सतीश वामन वाघ (संस्थापक –अध्यक्ष : सुप्रीया लाइफ सायन्स लिमीटेड) यांना आलेले निमंत्रण त्यांना '' पुढारी महामुंबई आयकॉन'' घोषित केल्याचे व त्यांचा गौरव केल्याचे द्योतक असून हा ''पुढारी आयकॉन'' त्यांना १ जानेवारी २०२५ रोजी प्रदान करण्यात आला आहे.**

**आम्हा सर्व ज्ञातिबांधवांना त्यांचा मानापासून गर्व वाटतो. –संपादक**

# ठाणे मंच आयोजित
## कारवार सफर-२०२५

ठाणे मंचाने कारवार सफर आयोजित करणार असल्याचे मुखपत्रिकेतून घोषित केल्यावर कारवारी मुंबईकरांच्या उत्साहास उधाण आले. सफरीच्या ठरवलेल्या तारखेनुसार आठ जानेवारीस सर्व इच्छुक कारवार येथील हॉटेल 'अमृत औरा'मध्ये सकाळी एकत्र जमले.

श्री. मच्छींद्र कसबेकर यांनी पहाटे ५ वाजता कारवारला पोहोचलेल्या मंडळींसाठी घरून चहाचा थर्मास आणून पहिल्या चहाची व्यवस्था केली. हे कौतुकास्पद!

ठरल्याप्रमाणे श्री. संतोष बोरकर यांनी पहिल्या दिवशी त्यांच्या हॉटेलात लंच आणि डिनरमध्ये मत्स्याहाराची मेजवानी दिली आणि दुसऱ्या दिवशी उत्तम प्रतीचा नाश्ता देऊन सर्वांना खूष केले. सर्वांच्या प्रति त्यांनी दाखविलेली आपुलकी वा दिलदारपणा हृद्य होता. त्यांनी त्यांच्या मालकीच्या हॉटेल 'साई इंटरनॅशनल'मध्ये भोजनाचा प्रबंध करून संध्याकाळी ठाणे मंचचा नियोजित सत्कार सामरंभ तेथेच करण्याचा आग्रह धरला.

संध्याकाळी आम्ही सर्व समुद्रावर फेरफटका मारून व म्युझियम बघून हॉटेलमध्ये हजर झालो.

सत्कार समारंभास कारवारचे मान्यवर ॲडव्होकेट अनिरुद्ध हळदीपूर, डॉ. नितीन पिकळे व डॉ. संजीव पिकळे सपत्नीक हजर होते.

ठाणे मंचचे उपाध्यक्ष सुरेश पालेकर यांनी प्रास्ताविक केले आणि मीरा प्रभू वेर्लेकर यांनी सर्वांचे स्वागत केले. तसेच श्री. संतोष बोरकर व श्री. मच्छींद्र कसबेकर यांचा परिचय करून दिला. सर्व मान्यवरांचा सुरेश पालेकरांनी पुष्पगुच्छ व भेट वस्तू देऊन सत्कार केला.

ॲड. हळदीपूर यांनी 'कारवार' हे नांव कसे पडले इथपासून कारवारची भौगोलिक व ऐतिहासिक माहिती उपस्थितांना दिली.

लंच तथा डिनरमध्ये विविध प्रकारचे मासे खाऊन मुंबईचे कारवारकर खूष झाले.

दुसऱ्या दिवसापासून विविध ठिकाणची मंदिरे व देवतांचे दर्शन घेण्यास सुरुवात झाली.

मुरडेश्वर, ईडगुंजी, अंकोला, अवरसा, शिरसी, तसेच सदाशिवगड येथील प्राचीन देवतांचे दर्शन घेण्यात आले. शिरसी येथील कै. अरुण भट यांची कन्या प्राची यांच्या जेवणाची लज्जत काही औरच होती!

११ जानेवारीला श्री. मच्छींद्र कसबेकरांनी एक सांगितिक मैफल आयोजीत केली. या मैफिलीत वैशाली मांजरेकर, श्री. प्रभात व सौ.प्रिया कुलकर्णी यांनी गाणी गायली तर डॉ. वैशाली दडकर व मिथीला गायतोंडे यांनी नृत्य करून वाहवा मिळवली.

१२ जानेवारीला श्री. मच्छींद्र कसबेकरांची पंचाहत्तरी साजरी करताना मिथीला गायतोंडेंनी डायरेक्ट केलेलं ''म्हातारा इतुका'' हे गाणे मीरा प्रभू वेर्लेकर यांनी गायले व त्याला मुक्ता कसबेकर व मिथीला यांनी अभिनय करून छान नटवले.

नंतर सर्वांनी सातेबाजारात जाऊन मनसोक्त खरेदी केली.

संध्याकाळी कारवार सफरीच्या आठवणी मनात ठेवून सर्वजण परतीच्या प्रवासाला निघाले.

श्री. सुरेश पालेकर यांनी घेतलेल्या पुढाकाराने व श्री. मच्छींद्र कसबेकरांच्या सहकार्याने ही कारवार सफर बिना कटकट, बिना संकट, बिना भरकट सफल झाली.

**– सुषमा मुळगांवकर** : ९८१९८ ३६४७६





संतोष बोरकर यांचा सत्कार करतांना सुरेश पालेकर



कारवार सफरीचे सहभागी

# सुफल सुंदर कारवार सफर




प्रत्येकाला आपल्या रोजच्या व्यापातून शारीरिक, मानसिक विश्रांतीची गरज भासते. शरीरस्वास्थ्य आणि मन:स्वास्थ्यासाठी याची नितांत निकड असते. ही गरज ठाणे मंच ह्या एनकेजीएसबी संघाच्या शाखेमुळे भागवली जाते. कारण भ्रमंती हा त्यांच्या उपक्रमांपैकी एक. सफरीची संधी मिळणे हा योग असतो. चांगले सहप्रवासी मिळणे हा दुग्धशर्करा योग असतो, तर आपल्या कारवारकरांची साथ लाभणे हा मध-खडीसाखरेचा अतिमधुर योग असतो, असं मी स्वानुभवावरून म्हणेन.

कारवार तालुक्यात जन्मले-वाढले, तरी संपूर्ण जिल्हा कधी पाहिलाच नव्हता. ही संधी या सफरीमुळे मिळाली. अवरसा, अंकोला, इडगुंजी, मुरडेश्वर, बनवासी, सदाशिवगड, बाड या गावातील मंदिरे आणि देवांचे दर्शन घडले. मंदिरात चाललेली पूजा-अर्चा, मंत्र-पठण, धूप-उदबत्ती, नैवेद्य यांचा मिश्रसुगंध, एकूणच मंगलमय वातावरण एखाद्या नास्तिकाच्या हृदयातूनही भक्तीरस झिरपवणारं होतं. रसिकांचं कारवारचं हृदयंगम निसर्ग सौंदर्य डोळ्यांच्या कॅमेऱ्याने टिपून घेणं, मन भक्तीरसात डुंबवून घेणं, कारवारच्या चविष्ट, मत्स्याहारावर भरपोट ताव मारून तृप्तीचा ढेकर देणं सगळंच विलक्षण! विशेष आनंददायी गोष्ट म्हणजे साऱ्या देवतांच्या मंदिरांबरोबरच आमच्या 'हिंदू हायस्कूल'चे ही दर्शन घेता आलं. शाळेचा चरणस्पर्श करून आत प्रवेश केला. रविवार असल्याने वर्गांवर कुलूपं बसली होती. माझ्या पाचवी ते अकरावीपर्यंतच्या सर्व वर्गांवर, ऑडिटोरियम, शिक्षकवर्ग, होमसायन्स कक्ष यावर प्रेमभरित नजर फिरवली, गुरुजनांना बालमैत्रिणींना भरल्या उराने आठवत एक फेरी घातली आणि माझ्या शाळेसोबत एक फोटोही काढून घेतला. असो.

मनोरंजनाशिवाय आणि अंताक्षरीशिवाय सफर सफल होणे नाहीच. अकरा तारखेला मच्छींद्रने वैशाली मांजरेकर या गायिकेच्या गीतांची मैफिल आयोजित केली होती. त्यामध्ये आमच्या ग्रुपमधील अनेक कलाकारांनी सादर केलेली अप्रतिम गीते, नृत्य पाहून सर्व रसिकांनीही आपसूक ताल धरला. खूप धम्माल उडवून दिली. १२ तारखेला मच्छींद्रने आपल्या वाढदिवसाचा अमृतमहोत्सव साजरा केला. सर्वांनी सामुहिक शुभेच्छा दिल्या.(केक कापल्यानंतर) त्यांच्या धर्मपत्नीने (सुहास) 'संगीत शारदा'मधील 'अवघे पाऊणशे वयमान' हे विनोदी नाट्यगीत साभिनय सादर करून सर्वांना पोटभर हसवलं. हे असं वर्षातून एकदा व्हायलाच हवं आणि हो,अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कारवारकरांशी जमलेली मैत्री ही कमाई काय कमी आहे? शेवटी एवढंच सांगेन की सुरेशभाऊ, मच्छींद्र आणि संतोष यांच्या सुबध्द नियोजनामुळे, दिलेल्या योगदानामुळे ही सफर सुफल पार पडली. सफरीचा हा आगळा-वेगळा सोहळा केवळ अविस्मरणीय ठस्साच!

– मीरा निशीथ प्रभूवेर्लेकर

# एनकेजीएसबी संघ, मुंबई मंच आयोजित
# आनंद मेळा २०२५

मिनी कारवार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जोगेश्वरी पूर्व येथील सरस्वती बागमध्ये के.जी.एस. सोसायटीच्या मध्यवर्ती पटांगणावर रविवार दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी मुंबई मंचाने तेरावा आनंद मेळा आयोजित केला. पाच वर्षांच्या दीर्घ कालावधीने हा कार्यक्रम पुनर्जिवीत करणे व तो यशस्वीरित्या पार पाडणे हे आव्हानात्मक होते. हे कार्य मुंबई मंचच्या नवीन सभासदांनी उत्तम तऱ्हेने पार पाडले. यात श्री. प्रदीप विनायक दाभोळकर यानी घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांचे विशेष कौतुक...

वॉट्सॲप, मौखिक जाहिरात आणि बॅनर्स या माध्यमांतून या मेळाव्याची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. या मेळाव्यातील प्रवेशद्वार, स्टॉल्सची आकर्षम मांडणी व सभोवतालची नयनरम्य विद्युत रोषणाई लक्षवेधी होती. ध्वनिमुद्रित वाद्य संगीत आणि स्थानिक ज्ञातिबांधव व इतर लोकांची उपस्थिती यामुळे या मेळाव्याची शोभा अधिकच वाढली.

लघुउद्योजक आणि उत्साही ज्ञातिबांधवांनी निरनिराळे चविष्ट आणि खमंग पदार्थ स्टॉल्सवर ठेवले होते. दहीवडे, चीज पॅटीस, पास्ता, बटाटे वडे, मेथी भजी, मिसळ–पाव, पाव–भाजी, टिक्की छोले इत्यादी स्नॅक्स आणि लिंबू सरबत, कोकम सरबत, तिवळ, चहा, कॉफी, मॉकटेल्स ही पेये विक्रीस ठेवली होती. या व्यतिरिक्त उकडीचे मोदक, गोड शिरा, केक्स, मॉफिन्ससारख्या गोड पदार्थांनी सुद्धा संध्याकाळची लज्जत वाढविली.

रविवार म्हटले की मांसाहार हा हवाच. कोंबडी वडे, बिर्याणी, चिकन शोर्मा, चिकन फ्राइड राईस, चिकन फ्राय, कोलंबी वडे, कोलंबी मसाला, खिमा–पाव, चिकन घी टोस्ट विथ मलबारी पराठा इत्यादी पदार्थांचा उपस्थित लोकांनी पुरेपूर आस्वाद घेतला.

उत्साही ज्ञातिबांधव आणि उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने लाडू, चिवडा, काजू व इतर ड्रायफ्रूट्स, पर्सेस, इमिटेशन ज्वेलरी, टूर्स अँड ट्रॅवल्स, टाय–डाय, ड्रेसीस, कपडे, हँडिक्राफ्टस, स्ट्रोक पेंटिंग्ज, पुस्तके, स्कीन केअर प्रॉडक्ट्स आणि इन्वेस्टमेंटस् ॲडवायजरी अशा विविध प्रकारच्या स्टॉलधारकांचा समावेश करण्यात आला होता. मेळाव्याला उपस्थित लोकांच्या खरेदीमुळे सर्व स्टॉलधारक खुश दिसत होते.

डॉ. सतीश वामन वाघ या आपल्या ज्ञातीतल्या नामवंत उद्योगपतीनी त्यांच्या आई कै. आशा वामन वाघ यांच्या स्मरणार्थ या आनंद मेळाव्याला दिलेल्या भक्कम देणगीमुळे तसेच एन.के.जी.एस.बी. बँक आणि सारस्वत बँक यांच्या आर्थिक प्रायोजकत्वामुळे हा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडला.

के.जी.एस. को–ऑप. हाऊसिंग सोसायटीच्या कार्यकारिणी मंडळातील सदस्यांनी सोसायटीचे मध्यवर्ती पटांगण, सालाबादप्रमाणे या वर्षी उपलब्ध करून मुंबई मंचचे साहाय्य केले.



डॉ. सतीश वाघ कामानिमित्त विदेशी गेल्यामुळे त्यांच्या पत्नी सौ. स्मिता वाघ व भगिनी अंजली सबनीस यांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव केला गेला. तसेच एन्.के.जी.एस.बी. बँकेचे वाईस चेअरमन श्री. शांतेश वर्टी आणि सारस्वत बँकेच्या ब्रांच मॅनेजर सौ. पूनम मालंडकर यांचाही पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

जोगेश्वरीतील 'रामेश्वर मंदीरा'च्या शतक महोत्सवानिमित्त त्यांच्या कार्यकारिणी मंडळाला विविध उपक्रम राबविण्यासाठी लागणारा निधी, इच्छुक देणगीदारांकडून गोळा करण्यासाठी मुंबई मंचतर्फे स्टॉल देण्यात आला होता.

सर्व उपस्थित मान्यवर, खवय्ये, ग्राहक, ज्ञातीबांधव, प्रायोजक आणि स्टॉलधारकांचा या आनंद मेळाव्याप्रति असलेला उत्साह आणि प्रतिसाद हेच मुंबई मंचच्या सभासदांच्या प्रयत्नांना मिळालेले यश...

–डॉ. पूनम दाभोळकर



प्रमुख पाहुण्या सौ. स्मीता सतीश वाघ व अंजली सबनीस यांचा सत्कार



मुंबई मंचचे पदाधिकारी



मेळाव्याचा देखावा


**आनंद मेळा २०२५ मध्ये सहभागी झालेल्या स्टॉलधारकांची नावे :**

| | | |
|---|---|---|
| दर्शना मुजुमदार | तृप्ती शेणॉय | सुप्रिया सिनारी |
| कल्पना शेणॉय | पंचमी वैष्णव | पूजा मयेकर |
| विद्या कसबेकर | वंदना कामत | श्रेया कोरगावकर |
| रेखा वागळे | बीना दाभोळकर | सुनिता बोरकर |
| शिल्पा सोमाणी | भक्ति हर्चेकर | प्रेरणा कुलकर्णी |
| श्रेया कलावर | श्रीजा होम फ्लेवर | सचीत रेगे |
| ऊमा कुलकर्णी | उल्हास वांतेकर | अनिता तेलंग |
| प्रतिक्षा नाईक | नेहा पामकर | विश्वनाथ पै |
| गायत्री बोरकर | अरिया टूर्स अँड ट्रॅवल्स | अनघा जोशी |

**आनंद मेळा देणगीदारांची नावे :**

| | |
|---|---|
| डॉ. सतीश वामन वाघ | रु. २,००,०००/– |
| श्रीमती मनिषा संजय कुलकर्णी | रु. १०,०००/– |

– प्रदीप दाभोळकर




**कै. शांताराम बर्डे यांची पणती कुमारी शमिका जोशी हिला राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत रिदमिक जिम्नॅस्टीकमध्ये तीन सुवर्णपदके**

सरस्वती बाग जोगेश्वरी येथे राहाणारे कै. शांताराम नागेश बर्डे यांची मुलगी नीलम दिलीप राजाध्यक्ष पुणे येथे वास्तव्याला असतात. त्यांची कन्या म्हणजे अर्चना जोशी. अर्चनाची १४ वर्षाची कन्या कु. शमिका पुणे येथील अभिनव विद्यालयमध्ये आठवीच्या वर्गात आहे. २०२५च्या जानेवारी महिन्यात कोलकता येथे राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा झाल्या. त्यात शमिकाला रिदमीक जिम्नॅस्टीकमध्ये तीन सुवर्ण पदके मिळाली व राष्ट्रीय खेळात पहिली आली. शमिकाचे हार्दिक अभिनंदन.



**सौ. विशाखा पालेकर मुळ्ये** यांना ' Economic times ' तर्फे ' business woman of the year ' हा मनाचा पुरस्कार

The Economic Times या दर्जेदार दैनिका मार्फत प्रतिवर्षी उद्योग व अर्थ शास्त्रातील कर्तबगार व्यक्तींना नामांकित व्यक्तीमार्फत पुरस्कार देण्यात येतात.'यंदा'आमगेल्या' सौ.विशाखा पालेकर मुळ्ये यांना "business woman of the year" हा पुरस्कार मिळाला. हा प्रतिष्ठित समजला जाणारा पुरस्कार केंद्रीय वित्तमंत्री श्रीमती निर्मला सितारामन् यांच्या तर्फे उद्योग व वित्त क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींच्या उपस्थितीत ८ मार्च रोजी प्रदान करण्यात आला. विशाखा मॅडमचे हार्दिक अभिनंदन.

विदुषी विशाखा या वित्त क्षेत्रामध्ये अग्रणी आहेत. आदित्य बिर्ला कॅपिटल लिमिटेड या अग्रगण्य कंपनीत त्या मुख्याधिकारी आहेत. त्यापूर्वी त्या ICICI या मोठ्या बँकेत Executive Director या जबाबदारीच्या उच्च पदावर कार्यरत होत्या. त्या C. A. ची परीक्षा गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झाल्या आहेत. World Economic Forum तर्फे २००४ साली " Young Global leader" म्हणून त्यांची निवड झाली होती. Business times मध्ये२००६ व २००९ या वर्षी The most powerful woman in India या यादीत त्यांचा समावेश होता. २०११ साली आपल्या संघाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात तेव्हांच्या आपल्या बँकेचे अध्यक्ष श्री महेश आरस यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला होता.



## 'सर्वप्रथम सेवा' याची व्याप्ती

मुंबईमध्ये हजारो हौसिंग सोसायट्या, टॉवर्स, इंडस्ट्रीयल इस्टेटस् वगैरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन म्हणजे एक डोकेदुखी व मनस्ताप असतो. भाडी गोळा करणे, बँकेत भरणा करणे, पाणी/वीज/प्रॉपर्टी टॅक्स यांची बिले भरणे, माळी, सुरक्षा, लिफ्टमन यांच्यावर देखरेख ठेवणे, दुरुस्ती देखभाल करणे, हिशेब ठेवणे अशी अनेक कामे असतात. कार्यकारिणीचे सभासद म्हणून कुणाला राहायचे नसते, जे मारून मुटकून सभासद होतात त्यांना वेळ नसतो. आम्ही ही सगळी ए टू झेड कामे करण्याची जबाबदारी घेतो. आमच्याजवळ सध्या अनेक संस्थांची कामे आहेत. त्यांत टाटा हाऊसिंग, लक्ष्मी इंडस्ट्रीयलसारख्या मातब्बर संस्था आहेत. त्याशिवाय लघु उद्योग सुरू करण्यासाठी आमच्याजवळ नोंदविलेले अनेक ट्रेड मार्क्स आहेत.

**उद्दिष्ट :** सेवा पुरविण्यासाठी आम्हाला मनुष्यबळाची आवाश्यकता आहे. इच्छुक ज्ञाति बांधवानी आमच्याशी संपर्क साधावा. त्यांना अर्थार्जन करण्यासाठी आम्ही साहाय्य करू तसेच आमच्या ट्रेड मार्क्सच्याद्वारे व्यवसाय सुरू करण्यासाठी आम्ही मार्गदर्शन करू. ज्ञातिबांधवांची सेवा हेही आमचे उद्दिष्ट आहे.

**संपर्क : न. अ. जोशी : ९८१९३०४५९९/९९२०४०४५९९**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** पोस्ट बॉक्स ११९९०, आझादनगर पोस्ट ऑफीस, अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३.

SERVICE FIRST®

98193 04599

SOCIETY SERVICE RESOURCE
समाजसेवा समृद्धि

99204 04599

सर्वप्रथम सेवा®

SOCIETY SERVICE RESOURCE

# *व्यक्ती आणि समाज*

छोटा-छोटा पाण्याचा एक-एक थेंब मिळून विशाल समुद्र बनतो, तसेच एक-एक व्यक्ती मिळून समाज बनतो. हे नाते असे की छोट्या थेंबा शिवाय समुद्रास आस्तित्व नाही तर व्यक्ती शिवाय समाज नाही. आता येथे प्रकृतिने एक-एक पाण्याचा थेंब Cohesion force नी घट्ट केला असल्याने समुद्रास अस्तित्व दिले, तसेच व्यक्ती व समाजास एकत्र ठेवण्यास काही नियम-कायदे, शिस्त, तसेच लोक-कल्याण, शांति, सुख-समाधान असतील अशा गोष्टी आवश्यक असतात. परिवर्तन प्रकृतिचा नियम असल्याने वेळोवेळी व्यक्ति व समाज दोघांतही बदल पर्यायाने असणारच. पण जेव्हा त्याचे संतुलन बिघडते तेव्हा फार बिकट अवस्था होते. प्रश्न पडतो की व्यक्ती समाजाकरता अथवा समाज व्यक्ती करता? आजपासून सुमारे ७०-८० वर्षापूर्वी, कुटुंब जे की, समाजाचे मूळ घटक आहे त्याची व्यवस्था आजच्या कुटुंब पद्धतीपेक्षा फार वेगळी होती. त्यावेळी संयुक्त कुटुंब असे व विभक्त कुटुंबाची कल्पनाच नव्हती. हळुहळु शहरीकरण, शिक्षण, नोकरी-धंदा ह्यामुळे कुटुंब छोटे होता होता इतके छोटे झाले की त्यांत आई-वडिल मावेनासे झाले. त्यामुळे वृद्धाश्रम आस्तित्वात आले. तसेच मनांत आल्यावेळी आग-गाडीत बसून मामाच्या गावाला जाणे काल्पनिक झाले, Appointment घेतल्या शिवाय नातेवाईक भेटेनासे व लग्न-कार्यात फक्त २-४ तास रिसेप्शनला जाऊन जेवण व Gift exchange, त्यातच कपडे व दागिने यांचे प्रदर्शन इतपतच नातेवाईकांशी संबंध उरले. मग शेजारी-पाजारी कोण आहे हे माहित नसणे स्वाभाविकच झाले व त्यामुळे एकाकीपणा (Loneliness) ची समस्या आली ज्या करता ह्या नंतर एक नवीन संस्था Time-Bank वे प्रचलन समाजात येईल व ही संस्था तरूणपणी आपला थोडा-थोडा वेळ समाज सेवेत जमा (Deposit) केल्यास त्या बदल्यात म्हातारपणात अथवा गरजेवेळी आपल्या सदस्यांची मदत करेल, आज पैसा व संपत्तीचे महत्त्व इतके वाढले आहे की चोरी, लबाडी, फसवेगिरी, अनैतिक आचरण करणारे छोटे छोटे Vijay Mallya, Mehul Chouksi आमच्या आसपास दिसू लागाले आहेत पण ते मोठ्या बंगल्यात, शहरात, गाडीत, विदेशात आहेत म्हणून समाजात त्यांना मान मिळू लागला व नैतिकतेचा पाणउतारा झाला. अशा वेळी वाटते की समाजाचे नियम-कायदे इतके शिथिल नसता जरा कठोर असले पाहिजेत, सुमारे १०० वर्षापूर्वी प्रसिद्ध हिन्दी लेखक 'प्रेमचन्द'च्या 'पंच परमेश्वर' कहाणीप्रमाणे सामाजिक न्याय व्यवस्था स्थापित करावी लागेल, त्याही पूर्वी अनैतिक आचरण केल्यास वाळीत टाकले जात असे पण आजच्या परिस्थितीत ते शक्य नाही कारण वाळीत टाकलेलेच आपला एक नवा समाज स्थापित करतील. तेव्हा साम, दाम, दण्ड, भेद पैकी 'साम'चा उपयोग करता येईल. अर्थात ईमानदारी व नैतिक आचरण करणाऱ्यांना प्रोत्साहन व त्यांचा उत्साह वाढवून वेळोवेळी त्यांची ठळक ओळख समाजात करवून दिली तर कदाचित नैतिकतेचा पाणउतारा कमी होऊ शकतो. थोडक्यात जीवनात प्रगति व पैसा आवश्यक आहे हे अटल सत्य आहे व त्या करता कुटुंबापासून Physical distance



असले तरी Cordial distance नसणार अशी मानसिकता तयार होईल व तरूण पिढीस आपणच कायम छोटे आहोत व आपणच आई-वडिलांच्या घरात आहोत असे वाटेल व वृद्धाश्रम कमी होतील. तसेच सणावारी, लग्न कार्यात सवडीप्रमाणे भेटी झाल्यास Loneliness पण कमी करता येईल व आपला थोडा वेळ दुसऱ्यास देऊन, मदत भाव व अडीअडचणीच्या वेळी एक-दुसऱ्यांच्या कामी पडल्यास Time Bank ची गरज पडणार नाही. चोरी, लबाडी, फसवेगिरीचा पैसा बाळगून Charity करण्याची पण गरज भासणार नाही.

भारताची संस्कृति, इतिहास, कला विभिन्न धर्म व प्रांतातील सण-वार, खाद्य पदार्थ, पोषाक, परंपरा ह्याची इतकी सुन्दर धरोहर (Asset) आमच्याकडे आहे की त्याच्या बळावर समाजात वेगवेगळ्या वर्गातील व्यक्ती एकत्र येऊन एक मोठा भारतीय समाज बनू शकेल. पण त्यांचा पाया म्हणजे प्रथम आपले कुटुंब व आपली छोटीशी जात व वाढता-वाढता मोठ्या समुद्राप्रमाणे भारतीय समाज, जो प्रेम, दया, क्षमा, मदतभाव, सादगी अशा गोष्टीत विश्वास ठेवेल व त्यामुळे शांति, समाधान, आनंद सर्वत्र असेल व त्यातून हे स्वप्न सत्य होईल.

धन्यवाद !

**- सौ. ज्योती दीपक तेलंग**,बंगळूरु
मोबा. ९७४००६५१२६

**Election results of the**
**SHANTADURGA DEVASTHAN, Kavale, GOA.**

**Congratulations to the entire panel of**

**8 led by Adv :**

**Vallabh Kudchadkar Winners of Effective Committee for**
Shantadurga Kavlem *

**President :** Vallabh Kudchadkar
**Secretary:** Shailesh Savordenkar
**Treasurer:** Sanjay Malkarnekar
**Attorney:** Dattaram Manjrekar

***Winners of Substitute Committee for Shantadurga Kavlem ***

**President :** Mayuresh Padgaonkar
**Secretary:** Gajanan Rege
**Treasurer:** Vaman Gaitonde
**Attorney:** Pankaj Khasnis

***

## ***श्री रामेश्वर मंदिर संस्थान***

सरस्वती बाग, जोगेश्वरी (पूर्व) मुंबई ४०००६०.

'आमगेल्या मंशांक' एकत्र गुण्यागोविंदाने राहता यावे या दृष्टीने १९१९ साली आपल्या ज्ञातीतील काही दूरदर्शी आणि सुजाण नागरिकांनी, जोगेश्वरी पूर्वेला स्टेशनपासून १० मिनिटाच्या अंतरावर कॅनरा गौड सारस्वत कॉ–ऑप. हौसिंग सोसायटीची स्थापना केली. यालाच पुढे सरस्वती बाग किंवा लाडाने ' मिनी कारवार' म्हणून ओळखले जाऊ लागले. या मिनी कारवारमधील लोकांची अध्यात्मिक भूक भागविण्यासाठी त्या काळातील जोगेश्वरी स्थित संत प.पू. टाकी महाराजांना साकडे घालण्यात आले. प.पू. टाकी महाराजांनी (भाईंनी) आपली प्रकृती स्वस्थ नसतानाही आपल्या कुलदेवतेची आळवणी केली. दस्तुरखुद्द टाकी महाराजांच्याच शब्दात सांगायचे तर भक्ताला भगवंताची जेवढी ओढ असते त्याच्या कैकपटीने जास्त ओढ भगवंताला भक्ताची असते, ही उक्ती प्रत्यक्ष अनुभवास आली आणि श्री मंगेश, इथे जोगेश्वरीला भाईंच्या सान्निध्यात राहावयास आले. इ.स. १९२६. ठिकाण श्री रामेश्वर मंदिर, जे केवळ भाईंच्या सद्भक्ती मंदिरापासून हाकेच्या अंतरावर आहे.

श्री रामेश्वर मंदिरातील शिवलिंगाच्या प्राणप्रतिष्ठेसमयी, मुख्य पुरोहितांनी सर्व शास्त्रोक्त मंत्रोच्चार आटोपल्यावर श्री भाईंकडे अर्थपूर्ण कटाक्ष टाकला आणि त्यांचा संकेत जाणून प.पू.भाईंनी शिवलिंगास हस्तस्पर्श केला. श्री मंगेशाची मनोमन प्रार्थना केली आणि त्याला इथे येण्याचे कळकळीचे आवाहन केले आणि त्याच क्षणी मंगेशीचा तो मांगिरिश अंश रूपाने त्या शिवलिंगात प्रवेश करता झाला, हे आपल्या सर्वांचेच अहोभाग्य.

सध्याचे श्री रामेश्वर मंदिराचे पुरोहित श्री. तुळशीदास सुखटणकर माम् आणि त्यांचे संपूर्ण कुटुंब ज्या आत्मीयतेने आणि सात्विक भावनेने श्री रामेश्वराच्या सेवेचे व्रत अंगिकारते त्याला तर तोडच नाही. मंगेशी येथे होणारे जवळपास सर्व उत्सव इथे साजरे होतात. दररोज होणारे नैवेद्य, अभिषेक आणि रूद्र उच्चारणामुळे मंदिरातील वातावरण मंत्रमुग्ध करणारे असते. रंगपुजेच्या निमित्ताने होणारी श्री रामेश्वराची सजावट डोळे दिपवून टाकणारी असते. वर्षभरातून सणावारी छत्रचामरासह निघणाऱ्या पालख्या, सोसायटीतील घराघरासमोर येतात. 'देव पालखीतून तुम्हाला भेटायला तुमच्या दारात येतो हीच केवढी अद्भुत गोष्ट.... त्या देवाला हार, फुले, नारळ अर्पण करून त्याचे स्वागत करतात, फळांचा नैवेद्य दाखवतात, देवाला ओवाळणी करतात आणि कृतकृत्य होतात. पालखीच्या पुढे सोसायटीतील भक्तमंडळी भजनाचा ठेका धरतात. वातावरण अगदी भक्तिरसात धुंद झालेले असते.

**असे हे आपले श्री रामेश्वर मंदिर यावर्षी ९ मार्च २०२५ रोजी (फाल्गुन शुद्ध दशमी) शंभराव्या वर्षात पदार्पण करीत आहे, हे सांगताना आम्हाला खूप आनंद वाटत आहे.**

इ.स.१९२६ साली परम पूज्य सद्गुरू श्री टाकी महाराजांनी लावलेल्या या छोट्याश्या रोपट्याचे गेल्या शंभर वर्षात मोठ्या वटवृक्षात रूपांतर होण्यामागे आपल्यासारखे श्रद्धाळू आणि उदार मनाच्या भक्त मंडळींचा सिंहाचा वाटा आहे यात शंकाच नाही. ९ मार्च २०२५ रोजी आपल्या श्री रामेश्वर मंदिराचा ९९ वा वर्धापन दिन होता. या दिवसापासून ते इ.स.२०२६ मधील फाल्गुन शुद्ध दशमीपर्यंतचे एक वर्ष (१०० वे वर्ष) आपण उत्साहात आणि आनंदात साजरे करावयाचे आहे. दर दोन तीन महिन्यातून एकदा तरी धार्मिक कार्ये, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम



राबविण्याचा आमचा मनोदय आहे. असे भरगच्च कार्यक्रम करायचे म्हणजे आपले, अर्थात भक्तमंडळीचे सहकार्य असल्याशिवाय अशक्यच. म्हणूनच आम्ही 'श्री रामेश्वर मंदिर संस्थान शतक महोत्सव फंड' या नावाने एक नवीन खाते NKGSB Bank मध्ये उघडले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर उत्सव साजरा करायचा हे ५–६ मंडळींचे काम नाही, हे आमचे विश्वस्त मंडळ जाणते. हा दृष्टिकोन मनात धरून, विश्वस्त मंडळाने हुशार, हरहुन्नरी आणि मुख्य म्हणजे श्री रामेश्वर मंदिरात भक्तिभावाने सेवा करणाऱ्या स्वयंसेवकांची एक 'शतक महोत्सव समिती' स्थापन केली आहे. NKGSB संघाच्या सहकार्यामुळे जोगेश्वरीमधील 'आनंद मेळाव्यात' आम्हाला एक स्टॉल विनामुल्य दिला गेला होता. समितीच्या मदतीने, श्री रामेश्वराच्या आशीर्वादाने आणि भक्तमंडळींचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळेच आम्ही हा पहिलाच उपक्रम यशस्वी केला. श्री रामेश्वराच्या समोर उभे राहून मनातल्या मनात प्रगट केलेली इच्छा पूर्ण झाली नाही असे होणारच नाही, इतके हे देवस्थान जागृत आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे श्री रामेश्वर मंदिराच्या ९६ व्या वर्धापन दिनी, आम्ही विश्वस्त मंडळाने मंदिराचे सुशोभीकरण करण्याची इच्छा श्री रामेश्वराच्या चरणी प्रगट केली होती. यासाठी जवळपास ८१ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित होता. पण श्री रामेश्वराच्या कृपेने आणि आपणासारख्या दानशूर व्यक्तींच्या सहकार्यामुळे, सुशोभीकरणाचे शिवधनुष्य त्या करोनाच्या काळात सुद्धा आम्ही लिलया उचलू शकलो.

या शतक महोत्सवाची आठवण आयुष्यभर जपून ठेवण्यासाठी एक स्मरणिका सुद्धा प्रकाशित करण्याचा विश्वस्त मंडळाचा मानस आहे. त्या स्मरणिकेमध्ये संस्थेचा इतिहास, आठवणी चित्रांकीत करून ठेवण्याचा आमचा विचार आहे. या स्मरणिकेत मान्यवरांचे मनोगत, विविध लेख कविता यांचा नजराणा सर्व भक्तगणांसाठी देणार आहोत. आपण सर्व जुनी जाणती वाचक मंडळी आहात. आपल्या वाचनात आलेले, श्री रामेश्वर मंदिराबाबतचे काही वाचनीय लिखाण वा आपण स्वतः लिहिलेले लेख कविता आपण या स्मरणिकेसाठी पाठवू शकता. त्यातील निवडक लिखाण आम्ही नक्की प्रसिद्ध करू. तसेच, या उपक्रमासाठी जास्तीतजास्त जाहिराती मिळविण्याचा आपण सर्वांनीच प्रयत्न करू या. थोड्याच दिवसात जाहिरातीसाठीचे दरपत्रक आणि आवाहन पत्र आम्ही प्रसिद्ध करू. जाहिरातीबाबतचे आवाहन पत्र (फॉर्म) मिळविण्यासाठी, आमच्या शतक महोत्सव समितीमधील सदस्यांशी किंवा विश्वस्त मंडळाशी संपर्क साधा.

A/c Name: Shri Rameshwar Mandir Sansthan Shatak Mahotsav Fund.
A/c No.: 006100100032000 IFSC code: NKGS0000006
याच अकाऊंटचा QR code सोबत देत आहोत.
आपले विश्वासू,

विशेष सूचना :
१) आपण दिलेल्या देणगीची पावती आठवणीने मागून घ्या.
२) QR Code, NEFT, IMPS किंवा UPI मधून पेमेंट केल्यास आपले नाव, पत्ता, PAN No. जरूर कळवा जेणेकरून पावती व प्रसाद आपल्याला पोहचवता येईल.

– लेखक : **उदय नाडकर्णी**

***

A name that spells its class !

**WINOVER CATERERS**

**Marriages, Thread Ceremonies, Engagement and Birthday Parties Etc.**

**WE DELIVER FOOD / SNACKS FOR PARTIES AT HOME**

**Take away and TIFFINS Or opt for Ala-carte**

**Amchi food and Variety cuisines**

ALL OVER MUMBAI-THANE-VIRAR

**Call or Whatsapp for our take away menu**

**Vinod Kaval / Ashwini / Rupali**

**98208 43392 / 90048 41198 / 98923 00608**

Shop No. 4, Andrea Apartment off Azad Road, Vile Parle East, Mumbai - 400 057

**SHREE HOMOEPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoepathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

अरुण भास्कर कसबेकर यांच्या '' **कवडसे मनाचे** '' ह्या पुस्तकाला वाचकांकडून चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. तरी अजून ज्यांना हे पुस्तक विकत घ्यावयाचे असेल त्यांनी NKGSB SANGH च्या Office मध्ये संपर्क साधावा.

ऑफीस फोन नंबर मुखपत्रिकेच्या कव्हर पेजवर दिला आहे. धन्यवाद.



## ऋणानुबंधाचे नाते आणि त्या सुखद आठवणी!

नातवाला ''मामाच्या गावाला जाऊया'' हे गाणं शिकवलं व नातू ते गाणं म्हणत असताना माझ्या मनात बालपणीच्या गोड आठवणी जाग्या झाल्या. शाळेच्या वार्षिक सुट्टीत मावशी, मामा किंवा आत्याच्या घरी थोडे दिवस रहायला जाण्याचा आमचा कार्यक्रम असायचा आणि मी त्याची वाटच बघत असे. पाचवी इयत्तेत असताना सुट्टीत आम्ही सहकुटुंब गोवा, कारवार आणि कलावती आत्याकडे अंकोल्याला राहायला गेलो होतो त्या आठवणी अजून मनात ताज्या आहेत. कलावती आत्या आणि भावोजी (श्री. भवानीशंकर नाडकर्णी) यांचं घर प्रशस्त होतं. परस, घरासमोर गोठा, घरामागची खोल विहीर आणि भवती फळा फुलांची अनेक झाडे व घर. भवतीची मोठी बागायत माझ्यासाठी तरी नंदनवनच होतं. गाईंना चारा घालणं, विहिरीतून पाणी काढणे, फांदीला लावलेल्या झोपाळ्यावर उंच झोका घेताना ऐकू येणारं पक्षांचं गुंजन, वानरांच्या आरोळ्या, पहाटे ५ वाजता जाऊन पाहिलेली रथ यात्रा अजूनही माझ्या मनात कोरलीय. आंबे, फणस, करवंदे, जामून, आमरस याची मेजवानी म्हणजे पैशानेही विकत घेता येणार नाही असा हा आनंद.

मामा, मावशी, आत्याकडे राहून लाड–कोड तर झालेच शिवाय छान खायला, पहायला, मौज करायला आणि शिकायला जे मिळालं ते शहरात राहून मिळत नाही. मी तर स्वत:ला नशीबवान मानतो. कारण मी बहुतेक सर्व नातेवाईकांच्या घरी शाळेच्या सुट्टीत एकदा तरी राहायला गेलो आहे. प्राचीनं केलेल्या चविष्ट जेवण आणि पक्वान्नांना नंतर बापू आग्रहाने फळे खायला देत असत. बापू जेवणानंतर नेहमी शतपावली घालत व तो कित्ता आता मी गिरवीत आहे. मुंबईला येताना ललित प्राची पेढे, लाडू, वडी घेऊन येत असे. मालिनी प्राची आणि दादा (श्री. महेश्वर द तेलंग) यांच्याबरोबर सहकुटुंब लोणावळा इथे त्यांचे बंधू डॉ. श्री. भालचंद्र तेलंग यांच्या बंगल्यात राहिली ती सुट्टी एवढी आवडली की पंचविशीत पण पुन: तिथे जाऊन राहून आलो. बंगल्याच्या बागेत विविध रंगाची गुलाबाची बरीच झाडे होती. संध्याकाळी दादांच्या सोबत फिरायला गेलो की गरम बटाटे वडे मिळत. झाडावरची करवंदे खाणे, झाडावर चढून भांडे भरून जांभळे काढून खाण्याची मजा निराळीच!

सर्वांच्या आठवणी आणि काही खासियती सांगण्याचा प्रयत्न करतो आहे. माझा मामेभाऊ डॉ. निनाद माझे समवयस्क आणि त्याचं–माझं खूप जमायचं. साहजिकच त्याच्याकडे मी जरा जास्त राहिलो. कांता मामा (श्री. अनंत म. गंडभीर) आणि नलू मामीने आम्हा पोरांना खूप मोकळीक दिली होती. सकाळी शिवाजी पार्कला धावत फेरी मारून किंवा बॅडमिंटन खेळून आल्यावर भूक लागली असेल म्हणून मामीचा खाऊ तयार असायचा तोही आमच्या आवडीचा. पोरी मामा (वैकुंठ म. गंडभीर) आणि तारा मामी नवीन उपकरणे (उदा. मिक्सर) प्रथम आणत असत. मामीने केलेला चवदार ताजा शिरा, भजी, तवसळी, वडे खाल्ल्यावर 'मामाची बायको सुगरण' ह्या गाण्यातल्या ओळीची आठवण यायची. नायगावला बाबू काका (श्री गणपती दा. शानभाग) आणि मालिनी काकीकडे बेळगावी जिन्नस मिळत. दत्ती काकांच्या (श्री. दत्ताराम दा. शानभाग) खेळाडू वृत्तीमुळे आमचा एकमेकांवर जरा जास्त लोभ होता. सौ. शैला काकींना माझी आवड माहीत होती आणि त्यांना पाईस (खीर) व बेसन लाडू करता येतो का हे पण मी विचारलं होतं. गमतीचा किस्सा म्हणजे दोन्ही काकांकडे कोंकणी व काकींकडे मराठीतून बोलणे व्हायचे. प्रेमळ सावित्री आत्याचं बोलणं लाघवी असे. दुर्गा भोऊजींच्या घरातून (श्री. दुर्गाराम सुकठणकर) पुरंदरे स्टेडियम दिसे. मी क्रिकेटचा सामना कधी त्या जागी खेळीन असं वाटलं नव्हतं व ते प्रत्यक्षात घडलं हा सुखद योग होता. दादरला हिंदू कॉलनीत भवानी आत्या आणि भाऊ मामा (श्री. रघुनाथ गंडभीर) रहात. ती आमची आत्यामामी. भाऊ मामाच्या घरी हापूस आंबे प्रथम आणलेले असायचे.

इथे दोन भेटींचा उल्लेख करावासा वाटतो. डॉ. निनादची अंबु मावशी (श्रीमती अंबुताई मो. कसबेकर) १९७८ साली मुंबईहून पार्से गावी जाण्याआधी पणजीला बसमधून उतरलो. त्याकाळी मी येत आहे असा निरोप द्यायला बिनतारी दूरध्वनी (मोबाईल) नव्हते. अंबु मावशी (मुखपत्रिकेचे संपादक श्री. प्रसाद मो. कसबेकर यांच्या मातोश्री)कडे सकाळचा पोहोचलो. मावशीनं स्वागत करून चहा आणि

खाऊ दिला व म्हणाली ह्या खोलीत सामान ठेव आणि आता दोन दिवस तरी राहून जा. गोव्यातील बोरसे गावी श्री. प्रभुदेसाई भाओजींकडे आम्ही राहिलो होतो. एकत्र कुटुंबे राहत असलेला त्यांचा वाडा मला आवडला. पप्पांचे मावसभाऊ विश्वनाथ काका (श्री. विश्वनाथ ना. नाडकर्णी) वॉर्डन रोडवरील उंच मजल्यावर असलेल्या घरी राहिलो याचीही आठवण आली. ही यादी मोठी आहे. जागेअभावी संक्षिप्त लिहिले आहे. अनावधानाने काही नावे लिहायची राहिली असतील तर क्षमस्व.
नातेवाईकांचे आदरातिथ्य, घरोबा, गावचा रम्य निसर्ग, प्रेमळ माणसं मला जवळून पाहता आली. विहिरीतून पाणी काढणे, नदीच्या किनारी निवांत बसून तरंगत जाणाऱ्या होड्या पाहात, पाण्याची झुळझुळ ऐकणे, निसर्गरम्य उंच पहाड, त्यांच्या घाटातून केलेले प्रवास, दूरवर पसरलेला कारवारचा स्वच्छ समुद्र किनारा, पहाटेचा सूर्योदय, धुके, चंद्राची कोर, गगनातील लुकलुकणारे असंख्य तारे आणि शांतता शहरात अनुभवायला मिळत नाहीत याची जाणीव झाली. जे पाहायला अनुभवायला मिळाले ते सुखद होते. त्याचे श्रेय आई पप्पा आणि माझ्या सर्व नातेवाईकांना आहे. या सर्वांकडे राहून जसा आनंद झाला तस्साच आनंद नातेवाईक घरी राहायला आल्यावर होत असे.फेब्रुवारी महिन्यात श्रीमती नलु मामी आणि श्रीमती शैला काकीकडे या सुखद आठवणींचा उल्लेख करताना मन भरून आलं. या साऱ्या आठवणी अविस्मरणीय आहेत.
नातेवाईकांनी केलेलं प्रेम, लाड आणि दिलेले आशीर्वाद यांचे ऋण फेडणे कठीण आहे. ते फेडायचा छोटासा प्रयत्न म्हणून सर्व नातेवाईकांच्या स्मरणार्थ आपल्या संघाच्या सेवा निधीला फुलाची पाकळी मी अर्पण केली आहे.

**– गिरीश म. शानभाग**

( girishaum@gmail.com)


**वाङ्‌निश्चय (साखारपुडा)**

| | | |
|---|---|---|
| १) **वरद गिरीष पिंगे** – दहिसर | व | **अंतरा कातरे** – गोरेगांव |
| २) **श्रेयस शंकर वागळे** – दहिसर | व | **श्रेया सुहास जोशी** – ठाणे |

**विवाह बंधन**

| | | |
|---|---|---|
| **चिन्मय**<br>(कुमार चिन्मय अमीत खेडेकर)<br>कळवा (मूळ गाव : रत्नागिरी) | **विवाह सोहळा**<br>२ डिसेंबर २०२४ | **आशना**<br>(कुमारी आशना ब्रह्मेश नाडकर्णी)<br>दहिसर (मूळ गाव : काणकोण) |
| **सिध्दार्थ**<br>(सिध्दार्थ रमेश कसबेकर,<br>`जोगेश्वरी) | **विवाह सोहळा**<br>२ डिसेंबर २०२४<br>रोजी संपन्न झाला. | **अनुषा**<br>(अनुषा विजय पालेकर,<br>हुबळी ) |

**दुःखद निधन**



**डॉ. अशोक ज. शं. आमोणकर**

**धि गोवा हिंदु असोसिएशनचे आदरणीय अध्यक्ष**

**डॉ. अशोक ज. शं. आमोणकर**

यांचे बुधवार दि. २५.१२.२०२४ रोजी दुःखद निधन झाले. संस्थेतर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली
मृतात्म्यास शांती लाभो ही ईश चरणी प्रार्थना.
समस्त धि गोवा हिंदु असोसिएशनचे कार्यकारी मंडळ आणि कार्यालयीन सहकारी
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः



# पुण्यस्मरण

**वडिल**



**श्री सदानंद शिवराव वागळे**
देवाज्ञा २३–०४–१९९५

**आई**



**श्रीमती कमला सदानंद वागळे**
देवाज्ञा १०–०६–२०१६

*तुमचे असणेच होते जीवनाला उभारी ।*
*आई–बाबा कुणा म्हणू आम्ही, आई–बाबा घरी ना दारी ।*
*आता राहिली फक्त आठवणींची शिदोरी ।*
*स्वामी तिन्ही जगाचा आई–बाबा विना भिकारी ।*

**- विजय सदानंद वागळे,**
**ठाणे (प)**
**९२२१६ ०७५७७**

### संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या
### (मागील अंकानंतर )
### उल्लेखनीय देणग्या

**१) श्री शरद सलगर यांच्या स्मरणार्थ यंदाही**

**१ लाख ५३ हजार ३ रुपयांची देणगी**

सदाशिवगड माध्यमिक शाळेचे लोकप्रिय मुख्याध्यापक सलगर मास्तर यांचे चिरंजीव व टांझानिया येथे ३५ वर्षे वास्तव्य करून नावलौकिकास आलेले श्री शरद सलगर यांचे १३ वर्षांपूर्वी दुःखद निधन झाले होते. त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेखा सलगर प्रतिवर्षी पतींच्या स्मरणार्थ समाजसेवा निधीसाठी, वृध्द सेवा निधी साठी व एज्युकेशन सोसायटी साठी प्रत्येकी रुपये ५१००१ या प्रमाणे एकूण १५३००३ रुपयांच्या देणग्या देतात. यंदा ही त्यांनी अशाच देणग्या दिल्या आहेत.

**२) उद्योगपती डॉ. सतीश वाघ यांजकडून आनंद मेळावा**

**सोहळ्यासाठी २ लाख रुपयांचे साहाय्य.**

दैनिक पुढारी तर्फे डॉ वाघ यांना ‘पुढारी आयकॉन‘ पुरस्कार.

गोरेगाव येथील ‘सुप्रिया लाईफ सायन्स ‘ या उद्योग समुहाचे मालक डॉ सतीश वामन वाघ यांनी संघाला ६ लाख रुपयांची देणगी दिली होती त्याचा तपशील गेल्या मुखपत्रीकेच्या अंकात दिला होता. १९ जानेवारी रोजी संघाच्या मुंबई मंच तर्फे सरस्वती बाग, जोगेश्वरी येथे आनंद मेळावा भरला होता. डॉ वाघ यांनी स्वतः होऊन त्या साठी २ लाख रुपयांचे सहाय्य केले.

चिपळूण येथून प्रसिद्ध होणाऱ्या दै. पुढारी यांच्यातर्फे समाजकारण, राजकारण, उद्योग, साहित्य इत्यादी क्षेत्रात ऊंच भरारी घेणाऱ्या कर्तबगार व्यक्तींचा सत्कार करण्यात येतो. यंदा १ जानेवारी रोजी दैनिकाच्या वर्धापन दिनानिमित्त त्यांनी एका गौरव सोहळ्यात ‘पुढारी आयकन‘ म्हणून डॉ वाघ यांना पुरस्कार प्रदान केला. डॉ वाघ यांना मिळालेल्या असंख्य पुरस्कारां मध्ये आणखी एकाची भर! डॉ वाघ यांचे हार्दिक अभिनंदन.

**३) श्री गिरीष शानभाग तर्फे वृद्ध सेवा निधी साठी**

**आणखी ६०५०१ रुपयांची देणगी**

कॅनडा येथे स्थायिक झालेले श्री गिरीष महाबळेश्वर शानभाग हे संघाचे एक हितचिंतक आहेत व वेळोवेळी संघाला देणग्या देतात. अलीकडेच त्यांनी वृद्ध सेवा निधी साठी आणखी ६०५०१



रुपयांची देणगी दिली आहे. ही देणगी आई, वडील, श्रीमती नंदिनी व महाबळेश्वर दामोदर शानभाग तसेच त्यांचे सर्व काका, काकी, मामा, मामी,आत्या,मावश्या व सर्व भावोजींच्या स्मरणार्थ आहे.

**४) कै.मंगेश गणपत साखरदांडे यांच्या जन्मशताब्दी**

**निमित्त वृद्ध सेवा निधी साठी पन्नास हजार रुपयांची देणगी**

के. मंगेश गणपत साखरदांडे यांचे हे जन्मशताब्दी वर्ष. त्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे दोन सुपुत्र मुलुंड येथे रहाणारे श्री सुमंत व पुणे येथे रहाणारे श्री सुधीर यांनी वृद्ध सेवा निधी साठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**५) श्रीमती स्नेहलता तेलंग यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त**

**संघाला पन्नास हजार रुपयांची भेट**

बंगळुरू येथे रहाणाऱ्या श्रीमती स्नेहलता विनायक तेलंग यांना २८ सप्टेंबर रोजी ७५ वर्षे पूर्ण झाली.त्यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांनी वृद्ध सेवा निधी साठी पन्नास हजार रुपयांची भेट दिली आहे. स्नेहलता ताई, शतायुषी भव!

(गेल्या अंकात श्रीमती तेलंग यांनी दिलेल्या पन्नास हजार रुपयांच्या देणगीचा उल्लेख आला होता. परंतु जागेअभावी त्याचा तपशील देण्यात आला नव्हता. तो तपशील वरील प्रमाणे)

### संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. जिवबा नागेश सरदेसाई यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती आशा यांजकडून | २५००० |
| २. | श्री. वासुदेव जनार्दन कामत यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शांता यांजकडून | २५००० |
| ३. | श्रीमती सुधा व श्री. विश्वंभर त्रिंबक कसबेकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. देविदास यांजकडून | १०००१ |
| ४. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१००१ |
| ५. | श्रीमती यमुनाताई, श्रीमती सपाका व श्रीमती सिंधुताई यांच्या स्मरणार्थ भाऊबिजेनिमित्त श्री. मंगेश शंकर बोरकर यांजकडून | ३००३ |
| ६. | श्रीमती नलिनी व श्री. महाबळेश्वर दामोदर शानभाग यांच्या स्मरणार्थ नातु श्री. चिन्मय गिरीष शानभाग यांजकडून | ६१०० |

## वृद्ध सेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१००१ |
| २. | श्री. मंगेश गणपत साखरदांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुत्र सर्वश्री सुमंत व सुधीर यांजकडून | ५०००० |
| ३. | श्रीमती ललीता व श्री. नागेश रामचंद्र मुजुमदार यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती निलीमा दिलीप म्हांबरे यांजकडून | ३०००० |
| ४. | श्री. शंकर (बापू) आनंदराव तेलंग यांच्या ५० व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. शिवानंद यांजकडून | ५००१ |
| ५. | श्रीमती नलीनी व श्री. महाबळेश्वर दामोदर शानभाग यांच्या स्मरणार्थ व नातेवाईकांप्रित्यर्थ श्री. गिरीष महाबळेश्वर शानभाग यांजकडून | ६०५०१ |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१००१ |

### ठाणे मंच - आठवण

ठाणे मंच आयोजित पाककला स्पर्धा २०२५ दिवस व तारीख : रविवार ४ मे २०२५. स्थळ : तेंडूलकर सभागृह, माहीम, वेळ : दुपारी ४ ते ७ वाजता.

तरी भाग घेणाऱ्या इच्छुकांनी आपली नावे एप्रिल अखेर पर्यंत नोंदवावीत. तसेच स्पर्धा झाल्यावर करावकेवर सुरेल हिंदी व मराठीतून गाणे गाणाऱ्यांनी आपली नावे स्पर्धे आधी द्यावीत असे ठाणे मंच ह्या निवेदना द्वारे सुचवित आहे. याची नोंद घ्यावी.

सविस्तर माहिती मुखपत्रीकेच्या जाने-मार्च २०२५च्या अंकात पान २३ वर उपलब्ध आहे. धन्यवाद !

### ☺ ☺ ☺ विजूले चुटकुले ☺ ☺ ☺

१) बायल : ही ''रोझा'' कोण आसा?
घोव : ती म्हळ्यार एक ''सुणी'' आसा. हांव तिका पैसे दिवोन हाडच्ये म्हण विचार करता.
बायल : हय, तरीच आज दिस भरात तिगेले चार पाच फोन येता शिल्ले!

– विजय सदानंद वागळे,ठाणे-९२२१६०७५७७



## ।। कालाय तस्मै: नम: ।।

| | नाव | गाव | सध्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | स्मिता सत्येंद्रनाथ बोरकर (पूर्वाश्रमीच्या दूर्गा दिनकर गायतोंडे) | हळगे | पुणे |
| २. | संतोष मारुती गांवकर (मारुती गांवकर हे हिंदु हायस्कूलचे जेष्ठ शिक्षक होते.) | कोडीबाग | कारवार |
| ३. | आशा अनंत हळदीपूर (पूर्वाश्रमीच्या आशा देविदास देसाई) | कडवाड | पुणे |
| ४. | जयश्री सतीश कसबेकर | कडवाड | पारले (पूर्व) |
| ५. | दिलीप माधव मुजुमदार (बोरकर-मुजुमदार ऑडीटर्स) | अंकोला | दादर |
| ६. | अरविंद वासुदेव पिंगे | उळवी | पारले |
| ७. | अनील माधव पालेकर | कडवाड | माहीम |
| ८. | पूर्णीमा अनील पालेकर | कडवाड | माहीम |
| ९. | वंदना रत्नाकर पिकळे | अंकोला | मुलुंड |
| १०. | अमीता किरण नाडगौडा (वेंकटराव तेलंग यांची कन्या) | नंदव्हाळ | पुणे |
| ११. | स्मीता वेंकटराव तेलंग | नंदव्हाळ | जोगेश्वरी |
| १२. | जगदीश शिवानंद तेलंग | नंदव्हाळ | अंधेरी |
| १३. | सुरेश सिताराम वागळे | माजाळी | पनवेल |
| १४. | शरद काशीनाथ वागळे | माजाळी | चेंबूर |
| १५. | सुरेश लक्ष्मीकांत (दिनू) वागळे | माजाळी | ठाणे |
| १६. | डॉ. श्रीपाद रामचंद्र वागळे | बाड | इंडियाना (अमेरीका) |
| १७. | लता पुरूषोत्तम (केशव) वागळे | हाणकोण | डल्लास (अमेरीका) |
| १८. | गिरीष विनायक वाघ | सदाशीवगड | बेंगलुरू |
| १९. | आशा शांताराम वाघ | सदाशीवगड | जोगेश्वरी |
| २०. | शिल्पा सुधीर वर्दे (पूर्वाश्रमीची नीता रामचंद्र कामत-कोडीबाग) | कोडीबाग | ठाणे |

***

**डोनेशन (देणगीं) साठी भरावयाचा फॉर्म पान नं ३१ वर दिला आहे. ज्यांना देणगी द्यावयाची असेल त्यांनी तो फार्म भरून पाठवावा.**

Place : _____________

Date : _____________

The Chairman,
The North Kanara G.S. B Sangh,
Laxmi Sadan, 361, Vithalbhai Patel Road,
Mumbai 400 004.

(Direct/ Through_____________)

Dear Sir,

1. I/ We wish to donate an amount of Rs __________ (Rupees _________________ ______________________________________________) to the Sangh, and remit the amount herewith in cash/ by cheque* No ________ dated ________ of ____________________________________(Bank) _______________(Branch) towards [2] or [3] ticked below

2. ☐ Please treat this amount as my /our Endowment to CORPUS FUND of the Sangh, This donation be treated as an Endowment on the occasion of _______________ ___________________________________________________________

to commemorate the memory of my /our ______________________________

Late Shri/ Smt ______________________________________________________

From _____________________________________________________________

Note - Amounts less than Rs. 5,000 /- will be accepted as a donations.

General Assistance Fund ☐ Donation ☐

Vrudh Seva Fund ☐

The yield from the investment of which be utilised for charitable and other purposes as per the objects of the Sangh.

OR

3. ☐ Please treat this as a general donation to be utilised as per the objects of the Sangh at the discretion of the committee of the Sangh.
Kindly Acknowledge and forward me/us your receipt.

Full name and complete residential address of the donor/s
(Please use CAPITAL letters only )

Yours truly

Shri/ Smt ____________________________
_____________________________________
_____________________________________
________________Pin ☐☐☐☐☐☐

Signature of the donor/s

Tel: (Resi)________________Mobile ________________

Off ______________________ Pan No ☐☐☐☐☐☐☐☐☐☐

(FOR OFFICE USE ONLY )

Acknowledged with thanks in the
Managing Committee's Meeting held on _____________
Receipt No: ____________
Date : ____________

Received on ____________

Chairman

Cheque should be drawn in favour of "N.K.G.S.B Sangh " Note : For (2) above, the amount has to be 1,000/- minimum. For (3) above, any amount can be given.



Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक प्र. मो. कसबेकर यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.